IJFANS INTERNATIONAL JOURNAL OF FOOD AND NUTRITIONAL SCIENCES

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876

*Research Paper* © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

# राष्ट्रीयशैक्षणिक धोरणआणि आर्थिक विकास :एक मागोवा

श्री.विलास बापूरावजी कांबळे

(सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग )

व्ही.एम.व्ही.वाणिज्य ,जे.एम.टी. कला व जे.जे.पी.विज्ञान

महाविद्यालय वर्धमान नगर, नागपूर

Email: vilaskamble38@gmail.com

## गोषवारा

शिक्षणाशिवाय मनुष्याचा विकास संभव नाही. आधुनिक शिक्षणाच्या इतिहासाला भारतात ब्रिटीश शासन काळापासून सुरुवात झाली.खऱ्या अर्थानेस्वातंत्र्य प्राप्तीनंतर शैक्षणिक विकासाच्या सुवर्ण काळालासुरुवात झाली.२१ वे शतक हे जागतिकीकरणाचे शतक म्हणून ओळखले जात आहे. विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या प्रचंड प्रगतीमळे ज्ञानस्फोटाचे प्रचंड हादरे जगाला बसले आहेत आणि बसत आहे. शिक्षण क्षेत्रातल्या बदलांचा वेग लक्षात घेऊन शिक्षणाच्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यात आली आहे. भारताच्या शिक्षणक्षेत्राला जागतिक स्पर्धेला तोंड द्यावे लागत असले तरी आपली गुणवत्ता जागतिक पातळीवर वाढवीण्याचे फार मोठे आव्हान आहे. शिक्षणावर आपल्या देशात जो खर्च करण्यात येतो, तो राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.५ टक्कांच्या पुढे जात नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तो निदान ६ टक्के असावा. देश स्वतंत्र झाल्यानंतर लगेच उच्च शिक्षणाच्या पुनर्रचनेला आरंभ झाला. त्या अनुषगांने १९४८ साली डॉ. एस्. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली 'विद्यापीठ शिक्षण आयोग' ज्यानियमात आले उच्च शिक्षणाची उद्दिष्ट्ये या आयोगाने ठरविली आहे. आर्थिक विकासासाठी जसे स्वातंत्र हवे तसे शैक्षणिक विकासासाठी स्वायत्तता हवी. आर्थिक विकास ही एखादी यांत्रिक प्रक्रिया नाही तर हा एक मानवीय उपक्रम आहे आणि विकास हा लोकांच्या कौशल्य गुणाने, नविन दृष्टीकोनाने व आवडी निवडीने होत असतो मानव त्या सर्व गुणांमुळे देशाला कसा आकार देतो हे महत्वाचे आहे व त्याच्या एकुण सर्व कार्यावर अवलंबून आहे. इतकेच नव्हे तर, व्यक्तीला ही सर्व जबाबदारी कळावी म्हणुन त्यांना शिक्षण देण्याची अत्यंत आवश्यकता आहे व शिक्षण म्हणजे फक्त वर्गावर वर्ग पुढे जाण्याकरिता नव्हे, तर आपल्या देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये व्यक्ती उत्तम प्रकारे कसे योगदान देवू शकतो याची जाणीव करुन देणे हे खरे शिक्षण होय.

मुख्य शब्द:राष्ट्रीयशैक्षणिक धोरण ,आर्थिक विकास ,उच्च शिक्षण,नवीन शैक्षणिक धोरण

**प्रास्ताविक**

शिक्षण हे मानवाच्या जीवनाचे आवश्यक अंग आहे मानवी विकासाचे ते एक साधन आहे. शिक्षणाशिवाय मानव म्हणजे पशु होय. म्हणुन मानवाला जोपर्यंत शिक्षण मिळत नाही तोपर्यंत तो स्वंयपुर्ण माणुस म्हणून जगु शकत नाही. निरक्षरता हा भारताला लागलेला कलंक आहे तो समुळ नष्ट झाला पाहिजे. भारत सरकारने २ ऑक्टोबर १९७८ पासुन सर्वव्यापी राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यास



IJFANS International Journal of Food And Nutritional Sciences

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

सुरवात करुन कालांतराने ५ मे १९८८ ला राष्ट्रीय साक्षरता प्रसारांना गती आणि अग्रक्रम दिला सोबतच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, मुलीच्या शिक्षणासाठी अधिक सवलती अनौपचारिक शिक्षण इत्यादी माध्यमातुन शिक्षणाचा प्रसार वाढत गेला १९५१ मध्ये १६ टक्के असलेला साक्षरतेचा दर १९९१ मध्ये ५२ टक्क्यांवर आला १९९८ मध्यो आपण तर ७४ टक्क्यापर्यंत ड्रोप घेतली. साक्षरता प्रसाराच्या कार्यात बरीच मोठी पायरी गाठली आहे. शिक्षणांबरोबर त्यांना व्यावसायिक शिक्षण द्यायला हवे त्यामुळे त्यांचा जीवनमानाचादर्जा उंचावेल.व्यक्तीचे शिक्षण निरंतर स्वरुपाचे आहे नवीन शैक्षणिक व्यावसायिक शिक्षणातुन नवनवीन कौशल्ये आत्मसात करता येतात. अशा कौशल्यांच्या जोरावर व्यक्तिची, समाजाची आणि पर्यायाने देशाची प्रगती अवलंबून असते नविन शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी, त्यांचे आरोग्य चांगले राहावे म्हणुन आरोग्य शिक्षण आणि व्यवसाय शिक्षणावर आपण जास्त भर दिल्यास सुंदर आणि सुजलाम सुफलाम भारताचे स्वप्न लवकरण साकार होवू शकेल.

**शिक्षणाचा अर्थ व व्याख्या-**

शिक्षण म्हणजे कालानुरुप व स्थानानुरुप व्यक्तिमत्वाचा विकास घडविण्याचे साधन मानले जाते. व्यक्तीच्या अंगी काही उपजत गुण असतात. त्या सुप्त गुणांचा विकास शिक्षणाद्वारे केला जातो. व्यक्तीला एक जबाबदार नागरिक बनविण्याचे सामर्थ्यही शिक्षणात असते. शिक्षणाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

१) महात्मा जोतीराव फुले -

'विद्येविना मती गेली। मतिविना नीति गेली।नीतिविना गति गेली। गतिविना वित गेले।वित्ताविना यावरून असे लक्षात येते की, माणसाची सर्वात महत्वाची गरज म्हणजे शिक्षण होय.शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।'

२) प्लेटो 'सत्य, शिव व सुंदर ही जीवनाची अंतिम मूल्ये. ती समजण्याची व अनुभवण्याचीपात्रता मनुष्याला आणून देणारे ते खरे शिक्षण.'

३) म. गांधी 'शिक्षण म्हणजे बालकांची शरीरिक, मानसिक व नैजिक वाढ. केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. एखादा उपयुक्त असा हस्तोद्योग शिकवून त्याच्या शिक्षणची सुरुवात केली पाहिजे.

**शिक्षणाचा उद्देश ;**

शिक्षणाचा उद्देश हा प्रशासन ,उद्योग,व्यवसाय ज्ञान-विज्ञानात जास्तीत जास्त नेतृत्व करणेआणि मानवीय संसाधनात ज्ञान,कार्यकुशलता,क्षमतायामध्ये वाढ करणे होय.

**नवीन शैक्षणिक धोरण -२०२३ :** नवीन शैक्षणिक धोरण भारतातील शिक्षणातबदल करण्यावर केंद्रित आहे , या माध्यमातून 'भारतीय समाजात असणारी पद्धती भारतात न्याय्य आणि समानता व ज्ञान समाजात बदल घडविण्यासाठी महत्वाचीआहे .' भारताला जागतिक ज्ञानात महासत्ता बनवून सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण देणारेहे शैक्षणिक धोरण आहे . नवीन शैक्षणिक धोरणाचे 5 मार्गदर्शक तत्वे आहेत, ते म्हणजे प्रवेश, समानता, गुणवत्ता, परवडणारी आणि जबाबदारी. पुढील २५ वर्षांत भारताला कुशल मनुष्यबळाचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने नवीन शैक्षणिक

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876

*Research Paper* © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

धोरण लागू केले; यालाच **'अमृत काळ '** असे म्हणतात . सन 2047 वर्ष पर्यंत विकसित भारत निर्माण करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. भारतातील नवीन शैक्षणिक धोरण 2023 ने तीन दशकातील जुन्या धोरणांची जागा घेतली आहे,या धोरणाने शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन केले आहे. नवीन शैक्षणिक धोरण 2023 हे भारताच्या विकासात वाढ आणि समृद्धीसाठी 'बदलहेच तत्व ' यावर आधारित आहे . नवीन शैक्षणिक धोरण हे शैक्षणिक क्षेत्रात संचालन करणारे शिक्षणपद्धती आणि त्या संबंधित कायदे आणि नियमात नवीनीकरण घडवून आणेल .

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**

नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात दिनांक २९ ऑगस्ट १९८६ मध्ये भारतातील राज्यांच्या व केंद्रशासित प्रदेशांच्या शिक्षण मंत्र्याच्या सभेत भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी आपल्या पहिल्याच घोरणात्मक भाषणात भारताच्या २१ व्या शतकातील आगमनाच्या दृष्टीने नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण घडविण्याचे मत व्यक्त केले. संपुर्ण भारतात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची कार्यवाही यशस्वीरित्या व पुर्वनियोजित दिशेने व्हावी या उदात्त भावनेने मानव संसाधन संपत्तीविकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी एक तिपर कार्यक्रम तयार केला होता. श्री. राजीव गांधीच्या शब्दाप्रमाणे २० ऑगस्ट १९८५ रोजी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' ठरविण्याच्या कल्पनेने "शैक्षणिक आव्हान" एक धोरणात्मक यथार्थ दर्शन या नावाचा एक मसुदा लोकसभेत सादर करण्यात आला होता शिक्षणाचा आशय आणि शैक्षणिक प्रक्रिया यांचा फेरविचार १९८६ रोजी केल्यावर केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंबधी मसुद्याच्या परिशिष्ठ पाच मध्ये उच्च शिक्षणाची चर्चा करण्यात आली होती ते पुढीलप्रमाणे आहे.

१)उच्च शिक्षणाचा विकास राष्ट्रीय गरजा पुर्ण करण्याच्या संदर्भात.

२)उच्च शिक्षणाच्या संधी सर्वांना उपलब्ध करणे.

३)देश स्वावलंबी होण्यास उच्च शिक्षणाची गुणवत्ता जागतिक पातळीवर उच्च दर्जाची असणे.

४)उच्च शिक्षणाचे अंग विद्यार्थ्यांत मुल्य, अभिवृत्ती, सामाजिक गुण रुजविणे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ चे स्वरुप -**

नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविताना अध्ययनाची जीवनाशी जवळीक साधण्याचा प्रयत्नकरण्यात येईल मग तो विभाग ग्रामीण भागात असो वा आदिवासी भागात असो, पहाडी अथवा डोंगराळ भागात किवा जंगली भागात असो तेथे राहणाऱ्या लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. हल्ली भारतात बेरोजगार तरुणांबी संख्या अफाट आहे. एवढेच नव्हे तर ग्रामीण भागात शिक्षण घेतलेली प्रौढ माणसे रोजगारासाठी शहराकडे धाव घेतात. त्यामुळे त्यांचा शहरी भागांना फायदा मिळतो. कारण ग्रामीण भागात शिक्षण घेतलेल्या माणसांचा ओढा शहरी भागाकडे अधिक असतो. त्यामुळे ही प्रवृत्ती रोखण्याचा प्रयत्न या नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात येईल.शहरांकडे शिक्षित लोकांचा जाणारा लोंढा थोपविण्यासाठी ग्रामीण भागातच रोजगाराची हमी निर्माण झाली पाहिले, असे दिसुन आले. २० फेब्रुवारी २००६ पासुन केंद्रशासनाने भारतातील ग्रामीण भागात किमान एका कुटूंबातील एका व्यक्तिला तरी शंभर दिवसाचा रोजगार मिळाला पाहिजे.अशी

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केली आहे. हे नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणला अनुसरुन असे केंद्र सरकारचे धोरण आहे. तसेच १९९१ आर्थिक उदारीकरण असल्याअशाप्रकारे वस्तु आणि सेवेतून (बँका, शिक्षण, डॉक्टर, वकील इ.) जीडीपी मध्ये वाढ होताना दिसुन येते. नविन शैक्षणिक धोरणाचा अनुषगाने ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केली आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ ची उदिष्ट्ये**

राष्ट्रीय शिक्षणाने भोरण १९८६ मध्ये लोकसभेत पारित करण्यात आले २९ पानांच्या धोरणाविषयक पत्रिकेत शैक्षणिक प्रश्नांचा व प्रणालीचा उहापोह आहे. त्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण१९८६ ची उदिदृष्ट्ये पुढीलप्रमाणे आहे.

१) शारीरिक, मानसिक, बौध्दीक व सौंदर्यदृष्टीचा व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न करणे.
२) शास्त्रीय दृष्टीकोन व लोकशाही वृत्तीची जोपासना करणे.
३) अपरिचित परिस्थितीला तोंड देण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे.
४) भौतिक, सामाजिक, तांत्रिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थितीची जाण निर्माण करणे.
५) श्रमप्रतिष्ठेसाठी निरोगी मन तयार करणे.
६) धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाची तत्वे अंगीकारणे,
७) राष्ट्रीयत्वाची भावना व राष्ट्रसन्मानाकरिता स्वतःला वाहून घेण्याची भावना राष्ट्रविकासाच्यादृष्टीने तयार करणे.
८) नैतिक मूल्यांची जोपासना करणे.
९) आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी विद्यार्थ्यांची मनोधारणा निर्माण करणे.

वरील उदिदृष्ट्यावरुन असे लक्षात येते की, शिक्षणातुन व्यक्तिविकास घडवून आणणे, व्यक्ती आणि समाज यांच्यात संबंध निर्माण करणे, लोकशाहीनिष्ठ नागरिक तयार करणे, व्यावसायिक शिक्षण देणे, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा परिचय करून देणे, बहूजन दलित आणि स्त्रियांचा उध्दार करणे, आर्थिक विकासासाठी योग्य शिक्षण किवा प्रशिक्षण देणे, लहान मुलांचा शारीरिक, मानसिक विकास करणे याअनेक दृष्टीकोनातुन शिक्षणाकडे पाहिले जातात.

**सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९९२**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ मध्ये बदल करुन सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९९२ मध्ये जाहिर करण्यात आले. वास्तविकरित्या १५७ परिच्छेद राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या धोरणात समाविष्ट करण्यात आले होते त्यापैकी ३१ परिच्छेदातच सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२ मध्येकिरकोळ बदल केलेले आहेत ते पुढीलप्रमाणे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या परिच्छेदात पुढील बदल सुचविण्यात आले आहेत –

१) शिक्षणावर ६ टक्के निधी राष्ट्रीय उत्पन्नामधुन खर्च करण्यात यावा.

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

२) आधुनिक युगात संगणकाचा वापर माध्यमिक शाळांमधुन करावा त्यानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. तंत्रयुगात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यासाठी याच पध्दतीचा वापर करणे सोईचे होईल.

३) तंत्रनिकेतनाचा विकास करून त्याची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने अग्रक्रमाने प्राध्यान्य देण्यातयेईल.

४) अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना ज्या शैक्षणिक सुविधा पुरविण्यात येतात त्यात बाढ करण्यासाठीजवाहर रोजगार योजनांचा वापर करावा,

५) शिक्षणाचा प्रसार दृतगतीने करण्याच्या दृष्टीने एक राष्ट्रीय पातळीवर चळवळ हाती घेण्यात यावी १४ वर्षापर्यंतच्या मुलामुलींना गुणवत्तापुर्ण मोफत सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.याचे उत्तम उदाहरण म्हणजे बचत गट यामध्ये १० ते १२ महिला एकत्र येऊन दरमहा काहीठराविक रक्कम बचत करण्याची सुरुवात करतात आणि गटाच्या सभासदाकडून आलेली मासिक बचत बँकेतील गटाच्या नावे असणाऱ्या खात्यात जमा केली त्याचप्रमाणे प्रत्येक सदस्याने दरमहा केलेल्या बचतीच्या रकमेची नोंद त्यास दिलेल्या बचत पासबुकात केली जाते. या बचत गटाकडून गरजु व्यक्तींना कर्ज दिले जाते, अंतर्गत कर्जव्यवहार व योग्य कर्ज वसुल केले जातात त्याचबरोबर काही लहान मोठी उदयोग केले जातात यामुळे त्याच्या आर्थिक विकासाला हातभार लागत असतो.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि आर्थिक विकास**

नविन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातुन त्यांना लिहण्या वाचण्याची कौशल्ये प्राप्त होते ही कौशल्ये टिकवुन ठेवण्यासाठी त्यांना कुठेतरी व्यवसाय मिळणे आवश्यक आहे. शिक्षण व्यवसायात गुंतले तर त्यातुन त्यांना आर्थिक विकास प्राप्त होईल आणि अधिकाधिक प्रगती करण्यासाठी त्याची वाटचाल होईल म्हणून निरतंर शिक्षण केंद्राच्या माध्यमातुन नवीन शैक्षणिक व्यवसाय शिक्षण देणे महत्वाचे आहे.व्यक्तिच्या प्रगतीसाठी त्याच्या जीवनाचा आर्थिक स्तर उचावणे गरजेचे आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असेल तर व्यक्तिच्या आवडीनिवडीला मर्यादा पडतात. आर्थिक विकासाचे तीन स्तर पडतात. कनिष्ठस्तर, मध्यमस्तर आणि उब्बस्तर त्यानुसार आखणी करून केंद्रांच्या माध्यामातुन व्यवसाय शिक्षणाचे ज्ञान नविन शैक्षणिक प्रणाली पर्यंत आपण पोहचवु शकतो. त्यासाठी समाजाच्या परिस्थितीनुसार गरजांवर आधारीत व्यावसायिक अभ्यासक्रमाचा ती आराखडा तयार करुन त्यानुसार व्यवसाय शिक्षण नवसाक्षरांना देण्यात यावे माणसाचं माणुसपण जपण्यासाठी संधी मिळणे गरजेचे आहे. समाजाचे आरोग्य चांगले असण्यासाठी सुध्दा व्यक्तिला आपले छंद जोपासता आले पाहिजे म्हणून नवसाक्षरांना त्यांच्या आवडीनुसार व्यवसाय शिक्षणाचं ज्ञान दिल्यास ते आवडीनी तो व्यवसाय करतील प्रत्येक व्यवसायात उद्योगधंद्याला लागणारे मनुष्यबळ ही आपोआप उपलब्ध होईल त्यामुळे उत्पादनात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासात हातभार लागेल आणि त्याच्या राहणीमानाचा स्तर उंचावेल.

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

**निष्कर्ष :**

शिक्षण ही बालकाच्या जन्मापासुन तर मरेपर्यंत चालणरी एक अखंड प्रक्रिया आहे ती केवळ शाळा, महाविद्यालयापर्यंत मर्यादित अथवा विशिष्ट स्थितीपर्यंत सीमिज नसते. शाळेप्रमाणे माणुस घरीदारी, समाजात, जीवनाज सर्वत्र शिकत असतो, ती ज्ञानात्मक पातळीवर चालणारी क्रिया मुळीच नसते. शारीरिक, भावनात्मक, सामाजिक आणि आर्थिक पातळीवर व्यक्तीचा जो विकास होत असतो त्याचाही समावेश शिक्षणातच होत असतो म्हणुन जीवन जगत असताना व्यक्तिला अनेक अनुभव येत असतात. शिक्षण हा मानवी विकासाचस केंद्रबिंदु आहे. शिक्षण पध्दती अमंलात येण्यासाठी बराचसा कालावधी लागतो त्यामुळे वेगाने पावले उचलेली आहे. लोकसंख्या म्हणजे समस्या नसुन एक उत्पादन शक्ती आहे.

संदर्भसुची -

१) डॉ. डुमरे जयमाला, 'साक्षरता जाणीव जागृती', जयश्री प्रकाशन, १५, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर - १०

२) डॉ. घोरमोडे के. यु/डॉ. घोरमोडे कला, 'भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या' विद्या प्रकाशन, नागपूर

३) डॉ. कोत्तपल्ले, 'भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद ४) www.wikipedia.org/wiki/economic_development

५)प्रतियोगितादर्पण,हिन्दीमासिक–मे२००८पृष्ठक्र.१८०३.

६)https://leverageedu.com/discover/school-education/essay-on-new-education-policy-in-500-words/

-----------------------------------------------------------------------------------------------------